म. ग्र. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५७८९

# अकरावी दिशा

वसंत बापट

REFBK-0012748
REFBK-0012748

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३३८२९ वि: [illegible]
क्रमांक ९५७८ नों दि १८.११.६२

# अकरावी दिशा

दा. क्र. १२८४८

**वसंत बापट यांचीं इतर पुस्तकें**

बिजली १९५२

दुसरी आवृत्ति १९६२

सेतु १९५७

दुसरी आवृत्ति १९६२

# अकरावी दिशा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33529 वि: कादं
क्रमांक ९५८१ नों दि: १४-११-८२

वसंत बापट

REFBK-0012748
REFBK-0012748

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

मूल्य चार रुपये

प्रथमावृत्ति : श्रावण १८८४
ऑगस्ट १९६२

© वसंत बापट

मुद्रक : वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४

प्रकाशक : गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

# अनुक्रम


अकरावी दिशा १
अंध ५
क्षणभर या सौधावर ७
भेट ११
प्रवास १२
प्रात:काळ १४
तूं कसली १५
छायांकित १६
साक्ष १७
कथित समय १८
राधा १९
मुकी मुकी रात्र २०
रूळ २१
हे हुषार सावध डोळे २२
रात्र २३
हात २४
शपथ २५
लेणें २७
चंद्रकोरीपरी कोंवळें हांसणें २८
आंधळा अंधार २९
क्षणाक्षणाची ताणलेली दोरी ३०
बंदी ३१
ओढ ३२
अरे, मी जाणतें सारें ३३
माझ्या सदाफुली फुला ३४
कोडें ३६
अक्षय अल्का ३८
छंद ३९
खांब ! ४०
निसर्गांतल्या आदिशक्तीपरी तूं ४१
तूं गर्भालस ४२
विषकन्या ४३
गोष्ट ४४
तुझे अधू अधू डोळे ४६
जिना ४८
लाखदां माझ्या मनाला ५०
पक्षी ५२
पिंपळ ५३
पंजा ५४
सावली ५५
गंधभरी ५६
मोर ५७
बाग ५८
हिमालय ५९
उर्वशी म्हणाली पुरूरव्याला ६२
स्वप्नामधुनी जरा दूर व्हा ६५
लावणी : शीतळ सौदामिनी ६६
लावणी : मुंबइच्या मनकर्णिके ६७

लावणी : चौरंगाची ६८
लावणी : राधिकेची ६९
लावणी : अबोलीची ७०
तान्हें ७१
हिशेब ७२
ऋण ७३
यात्रा ७४
रात्र : झेलमच्या बागेंत ७५
रात्र : बिझासच्या रानांत ७६
रात्र : पहलगामच्या पहाडांत ७८

## दोन संगीतिका

उमा ७९
स्वप्न ९१

Love, you saw me gather men and women,
Live or dead or fashioned by my fancy,
Enter each and all, and use their service,
Speak from every mouth,—the speech, a poem.

**—Robert Browning**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 33527 वि:
क्रमांक 7569 नों दि 98-

## अकरावी दिशा

एक भिंत हलवा किमान, ही इथली, उत्तरेची.
ध्रुवाच्या स्निग्ध प्रकाशानें उजळलेला वारा
येऊं दे केशरफुलांच्या पायघड्यांवरून.
मरुभूमीच्या लाल पाषाणांवरील शेष केशरिया
नर्मदेच्या जायपत्री प्रवाहाचा दर्प...
यांना माझें आमंत्रण आहे
बालेघाटी लावणीच्या तीव्र गंधारांत
रूपमतीचा कोमल निषाद मिसळलेला मांडूच्या सांध्य मांडवांत...
सातपुड्याच्या किनाऱ्यावरील
कसार-बारीचें पाणी पिऊन,
पंचवटीच्या पायवाटेनें
येऊं दे अनोखी पंछी माझ्या खांद्यावर.
मानसहंसाच्या शुभ्र पंखांवर,
गंगासंगानें पुलकित झालेली
यमुनेची कृष्ण वाळू रेंगाळते आहे.
ती वाळू इथें पडूं दे...
निदान शेलाट्या बोरीच्या चिंबट चवीनें चावट झालेला उन्मनी वारा
उडवूं दे एक उनाड बट...अरे, त्याला वाट द्या.

एक भिंत हलवा निदान, ही...पूर्वेची...
अंदमानच्या अंधारांतून उगवणाऱ्या आरक्त सूर्याला आडवूं नका.
अष्टपदीच्या दोल्यावर बसलेलीं
हीं कोनारकचीं कोनरहित युग्में...
त्यांना माझ्या माथ्यावर पाय टेकूं द्या.
हालाची गाथा छेडणाऱ्या पहाटेला झोप कशी येत नाहीं?
पूर्वांचलाच्या वैद्या गोपुरांवर रुपेरी चीनांशुक पाहूं दे मला

मराठी ग्रंथ संग्रहालय
92680

प्रसन्न गोदावरीच्या किनाऱ्यापासून सुरू झालेला
हा हिरवाहिरवा सागर वाहूं दे...
पंढरीच्या वाटेवरची हळुवार कृपेची वाट
सत्तावीस किल्ल्यांसह अवघडलेले घाट...पाहूं दे
निदान पसवलेल्या केळीच्या तांबुस तृप्तीचा गुलाल...
अरे, त्याला वाट द्या.

ही पश्चिमेची गारकांचेची भिंत...तिची जरूरच काय?
निळ्या ओढणीखालीं लपलेल्या निळ्या जलवंतीचा अभिसार
सायंकाळच्या रंगपंचमीची उधळमाधळ—मला तिकडे नजर ठेवूं दे.
या शिंपल्यांत अस्ताव्यस्त विखुरलेले हे रंग आवरील कोण?
इकडूनच येतात त्या मत्स्यकन्या, मध्यसमुद्रांतून, द्राक्षमळ्यांतून.
माद्रिदचे मस्त बैल होतात पर्वतप्राय लाटा
देतात धडका जम्बुसरच्या दन्तुर हत्तींना
सिंधुदुर्ग, कालिकतवर तेच उन्मत्त आघात
शुभ्र पंखांचे हे पक्षी त्यांच्या वशिंडांवर किती वेळ झुलतील!
सुरूंच्या बनांतून निघालेला खारा वारा
दोना पॉलावरील गितारीचे सूर पिऊन झिंगला आहे.
सिन्यॉर, तुम्ही माझ्याकडे या जुहूच्या जावळामधून...
निदान माझ्या जास्वंदी कुंपणावरील बुलबुल...अरे, त्याला वाट द्या

किमान ही दक्षिणेकडची भिंत–बाजूला करा ही.
तीन समुद्रांच्या वेळेवरचा तिरंगी गोफ,
धनुष्कोडीचीं फसवीं धनुष्यें,
रामेश्वरला उमटलेलीं अभोगी कन्याकुमारीचीं दीपांकित पावलें
त्यांची वाट चुकवूं नका.

मदुरेच्या मंदिरांतील पुष्ट पाषाणांनो, असे इकडून या.
रामगिरीकडून येतांना भग्न विजयनगरीची तुटलेली मेखला घेऊन या
जिंजी-तंजावरपासून वर उफाळलेल्या यज्ञज्वालेला आडवूं नका
मराठ्यांच्या अंगेची शपथ आहे तुम्हांला.
पंचगंगेच्या कांठावरील इरसाल पटक्यांत बांधलेलें कणीस
कृष्णेच्या बेगुमान पाण्यावर उडालेले बेभान भाले
ते मला पहायचे आहेत.
प्रीतिसंगमापाशीं तर मी उगम पावलों.
कोयनेच्या कांठानें निघालेल्या वाऱ्याला सिंहगडच्या बालेकिल्ल्यांत
कोंडूं नका...
जंजिऱ्याच्या बुरुजाचा एक दगड सैल करून
येऊं दे त्याला खांदेरीच्या खांद्यावरून.
निदान या जांभळांच्या, आंब्यांच्या वासानें पोसलेला वारा...
अरे, त्याला वाट द्या.

वणारच असाल सगळ्याच भिंती—तर ठेवा मग!
निदान हें छप्पर ठेवूं नका—ओझ्याच्या वजनाचें...
इथूनच फुटते वाट विश्वामित्रसृष्टीची...
ब्रह्महृदयाची ती अधीर खूण तुम्हांला दिसत नाहीं का ?
दोन मार्ग निघतात हे...वेदांची शपथ
सूर्याच्या किरणांच्या पोलादी तारांवर,
तर्कांच्या परशूनें ताऱ्यांचे छेद करीत
सत्याच्या रुळलेल्या मनस्वी मार्गांवर मला जातां येणार नाहीं.
माझा मार्ग दुसरा आहे.
चंद्रकिरणांच्या लक्ष्मणझूल्यावर भोंवळ आल्याशिवाय

कशी सांपडणार आकाशगंगा ?
तुम्हांला माहित आहे ना ?
कोऽहंच्या हांकेला सोऽहंचा प्रतिसाद मिळतो
तें अनादि देठाचें ओंकार-कमळ मी शोधीत आहें.
किरणांतून येणाऱ्या त्याच्या परागांना वाट द्या, अरे, त्यांना वाट द्या,
तीच अकराव्या दिशेची धूळ आहे.

## अंध

फिरून कोठुन दिसेल आतां...
तांबडमाती
जांभुळझाडी
वन पाडाच्या जांबांचें
पाउलवाटा
बाभुळकांटा
तळ्यांत देउळ सांबाचें

फिरून कोठुन होइल आतां...
लव्हाळ पातीं
चावत दांतीं
हसणें हळव्या मायेचें
ऐन दुपारीं
पिंपळपारीं
सोन-चांदणें छायेचें

फिरून कोठुन पाहिन आतां...
कांट्यांमधले
अर्धे पिकले
घोस ठोस करवंदांचे
वारा चंचल
उडवी अंचल
खण जरतारी बुंदांचे

फिरून कोठुन करशिल आतां...
अल्लड चाळा

दुल्लड माळा
मधेंच खुपतो बोरमणी
धरतां मंडल
हलती कुंडल
गालावर ये चोर-कणी

फिरून कोठुन फिरणें आतां...
ढवळीं किरणें
पिवळीं रानें
निरुंद रस्ता बांधाचा
पोर गुराखी
डोळे झांकी
आव घालुनी अंधाचा

## क्षणभर या सौधावर

क्षणभर या सौधावर
बैस पुन्हां मजजवळी
आज जरा...
तीच ऐट निरपराध
तेंच सोंग साजेसें
आण जरा...
रुसवा तो...हसणें तें
ही अशीच जिवणीची हालचाल...
भिंवईवर झुकलेल्या
सैर बटा छेड पुन्हां
आणि मान वेळावुन
विसराया सर्व मला
लाव जरा...

ये क्षणभर मजजवळी
पश्चिमेस...त्या तिकडे...
सूर्याचा घट उलटा
सागरांत बुडतांना
पाहूं या
आणि तसें बघतांना...
गुंफूं या दोघेंजण
हात असे कटिभंवतीं
भानावर नसल्याचें भासवून...
चल बुडत्या सूर्यासह
बुडवूं या वर्तमान
चल उलट्या पावलींच

भूताच्या राज्यांतिल
रात्रिंचर होउं जरा...

तूं नव्हतिस दुसऱ्याची
माझीही नव्हतिस तूं
नव्हतिस गे तूं तुझीच
तेव्हां परि !
माझी तर भाग्यरेष
तळहातीं होति तुझ्या...
म्हणालीस तूंच तसें
केव्हां तरि...

केव्हां तरि
घेउन गेलीस मला
त्या तिकडे...
रखरखती भर दुपार
क्षितिजावर
डोंगर तो गहन निळा
शिखरावर शुभ्र तुरा जपणारा
दूर्वांकित माळ पुढें दीर्घ दीर्घ...
पलिकडला पाणलोट
कळकाचा सांकव तो कुरकुरता
अलिकडली जाळी ती कांटेरी
करवंदी आठवणी रुजवाया...
शेवाळी पाण्याशीं

उलगडतें पाणकणिस
घसमुसळे ओरखडे बुजवाया...

भरल्या का जखमा त्या
बुजले का ओरखडे
मंगळसूत्रांत तुझ्या
सर्व खुणा लपव गडे...मात्र उद्यां...
आज जरा
ये क्षणभर सौधावर
तीच ऐट निरपराध
तेंच सोंग साजेसें
आण जरा...

आठवतें—
चुकलेल्या वाटेवर
चिंचांच्या त्या बनांत
गाल तुझे गामुळले
नसतां कांहीं मनांत...
येतांना ओलांडुन
कुंपण तें...गोंधळून
माझ्या हातीं दिलास
हात...जरा घुटमळून...
आणि तरी
कांटेरी तारेनें...प्रामाणिक...
खरचटलें पाउल तें अंध तुझें
बसलों तेथें...तसेच

कुंपणापलीकडेच
काय बरें सळसळलें...?
बिलगलीस...आणि तुझें
भय सारें विरघळलें...

सांपडली वाट तुला
मी अजूनहि भ्रमांत
लपवलेंस सर्व कसें
भाळींच्या बिंदुल्यांत...!
रागवूं नकोस गडे...
राहूं दे...
त्या साऱ्या आठवणी
जाऊं दे...
ये क्षणभर बैस अशी
मजजवळी सौधावर
क्षणभर ये...
हा बघ झालों अबोल...
तूं अबोल
मी अबोल
तम केवळ बोलूं दे
ताऱ्यांच्या अक्षरांत
बुडला बघ घट माझा
अंधाऱ्या सागरांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम 33529 वि: ०५१/०२
क्रमांक 9565 नों: दि: 98-77-

# भेट

अशी भेट झाली...त्याचें
ओझें वाटूं नये तुला
तुझा परागहि नाहीं
ढळणार माझ्या फुला

माझी निववाया तृषा
नाहीं मारणार चोंच
पुन्हा फुटतांच वाटा
राहशील तुझा तूंच

माझे अबोलीचे ओठ
त्यांना पाषाणाचें बळ
माझा अभोगी शृंगार
लपवतो सारे वळ

तुझ्या आभाळाचा रंग
निळा राहील निखळ
नाहीं झुकणार तिथें
माझी वेडी घनावळ

ठेव असाच अभंग
तुझा काचेचा तलाव
कसा पाहीन मी त्याचा
पुन्हा झेपावून ठाव

अरे मोकळ्या गळ्यानें
गीत गात रहा तुझें
अशी भेट झाली...त्याचें
नको वाटूं देऊं ओझें

## प्रवास

बकुळीखालीं भोळी चिमणी
खेळत होती छप्पापाणी
किंचित् अपऱ्या नाकाची
भुरक्या झिपऱ्या केसांची

दिवस उडाले गातां गाणीं
तरी खेळली काचापाणी
काचा गहिऱ्या रंगांच्या
आभाळाच्या भिंगाच्या

धुक्यांत निजलें पडकें देउळ
दंवांत न्हालें कोकमपाउल
भिजली नक्षी मेंदीची
झोप उडाली बिंदीची

उलगडतांना अडलें थोडें
गुंजवनांतिल चकवें कोडें
घट्ट उसवल्या बाहीचें
'बोलणार मी नाहीं'चें

कानीं कुंडल बावुळलेलें
ओठीं जांभुळ गाभुळलेलें
गळ्यांत माळा हातांच्या
'पुरे पुरे रे आतां'च्या

सुकली बकुळी फुटल्या काचा
सुटलीं कोडीं पिचल्या टांचा

सुकल्या माळा तेव्हांच्या
'पुन्हां भेटशिल केव्हां'च्या

चिमणी झाली पुरी शहाणी
विसरुन गेली वेडीं गाणीं
चौरस घरटें ऊब सुखी
'कसें काय ?'चें बूच मुखीं

## प्रातःकाळ

माझ्या प्रातःकाळच्या उन्हाला बळ आलें
फुलवण्याइतकें
तोंपर्यंत
फुललेलीच होतीस तूं मावळत्या चांदण्यानें.

माझें प्रातःकाळचें ऊन
प्राजक्ताच्या शय्येवरून तळमळून उठलें...
झालें प्रखर वनवासी होतांना...
वितळलें स्वतांतच
तळपलें दिमाखांत
तळपतां तळपतां विसरलें पराभव
प्रातःकाळचा.

कलतांकलतांनाच किलकिल्या डोळ्यांनीं
पाहिली तुला कोमेजलेली
आणि तुझ्या कोमेजण्यानें कोमेजलें तेंच

सायंकाळच्या हातांत
सांपडतां जावळ
गडबडा लोळत जमिनीवरती
हात लांबवून
शिवूं पाहतें उंबरा, तोच, तुझाच,
विसरून पराभव
प्रातःकाळचा.

## तूं कसली

'असा कसा हा मोहर गळला सारा ?
कसें उषेचें तेज ढळे दिनमानीं ?'
विचारलें मीं. अविचारच तो माझा,
हटवादी तूं, मौन तुझें अभिमानी.

तुझ्या मनाचे तट फोडुन, अश्रूंनीं
माझ्यापाशीं फितुरी जेव्हां केली,
तेव्हां सारें उलगडलें...पण आतां
कसें तुला समजावूं ? संधी गेली.

तूंच तुझ्या रक्ताच्या उसळीसरशीं
बुडी घेतलिस त्या तसल्या डोहांत
आवर्तांतुन गिरक्या घेतां घेतां
भोंवळ केवळ उरली तव देहांत.

वाट पाहतों...तुझ्या मुखांतुन केव्हां
अनुतापाचा उठेल एकच बोल;
अजून वेडा उभा इथें नावाडी...
तूं कसली ! तूं तशीच बुडशिल खोल !

# छायांकित

छायांकित अंगणांत
फिरतें मी गोरीमोरी
दिवा जळे माडीवर
वर पाहण्याची चोरी

कशी कातरसांजेला
शुद्धबुद्ध हरवली
तीच पिशाचसावली
फास घालते पावलीं

पुन्हा पुन्हा चांचपतें
आठवणीचा तो वण
रायआंवळीचें झाड
करी चांदण्यांत खूण

चंद्र हासतो मिश्किल
डोळे मोडितात तारे
रातराणी येताजातां
करी सूचक इशारे

तुझी धिटाई उदंड
आणी शहाऱ्यांच्या लाटा
चूड पेटवून डोळां
आज जागतो चव्हाटा

दिवा जळे माडीवर
करी फडफड वांया
छायांकित अंगणांत
मीहि झालें छायाछाया

## साक्ष

साक्षीला चंद्रकला   साक्षीला रात्र निळी
या इथेंच रानजुई   चुरगळली पायदळीं

साक्षीला आठ दिशा   शुक्राची ज्योत वरी
या इथेंच निमिषभरी   दरवळली मुग्ध कळी

थरथरला स्थिर पिंपळ   खळबळलें जळ चंचळ
वादळांत सांपडली   या इथेंच दीपकळी

गहिवरलीं रानफुलें   कुजबुजले रातकिडे
या इथेंच पापानें   शापियली शपथ खुळी

साक्षीला दोन मनें   साक्षीला एक स्मृति
हे सारे फिरले तर   साक्षीला मी सगळी

## कथित समय

कथित समय टळला   स्तिमित चकित गोपी
स्मरण करुन गेलें   व्यथित हृदय झोपीं
चरणरव न आला   शरणरहित विजनीं
क्षुधित नयनयुगला   तरि न लाज अजुनी
जळुन थकुन विझलीं   छलित ललित गात्रें
जुळुन पुसुन बुजलीं   अमित निमिषचित्रें
तरिहि अजुन हरणी   वळुन वळुन पाही
मुठिंत पदर धरुनी   हृदय मिटुन घेई

कथित समय टळला   व्यथित गोपललना
गहन हृदयपात्रीं   चुबुकचुबुक यमुना
नयनघन निवाले   पडुन कुटिल धारा
पदर भरुन वाहे   शिशिरविकल वारा
क्षितिज सकल भिजलें   तिमिरसलिलिं चिंब
मुकुलरहित उरले   पुलकमय कदम्ब
तरिहि मनमयूरी   गहन गगन पाही
तृषित मृगमना ही   मुरलि पिउन राही

# राधा

बाहेर आषाढ-
घनांच्या धारा
अंधारी यमुना
अनयाच्या घरांत;
बिभिस्त राधा...
पडून राहिली
निद्रिस्त गोपाच्या
निष्ठुर करांत.

मनांत सांवळा
तरुण मेघ...
काजळी बिजली
राधेच्या उरांत;
दोन विझलेल्या
दिव्यांच्या सांगाती
दोन पेटलेल्या
डोळ्यांची वरात.

पडल्या पडल्या
बिभिस्त राधा
उडी घालते
यमुनेच्या पुरांत;
मध्य रात्रींच्या
निवांत मौनांत
बुडाली गोपिका
मुरलीच्या सुरांत.

# मुकी मुकी रात्र

मुकी मुकी रात्र
सुकी सुकी वाळू
वारा हळूहळू

झाकलेलें बिंब
वाकलेल्या लाटा
थेंबथेंब कांटा

झडलेले माड
पडलेलीं शिडें
शब्द शब्द अडे

आंदुळले आसू
पांगुळले श्वास
सुन्न आसपास

मुकी मुकी रात्र
फिका फिका साज
कां रे असें आज ?

रूळांनीं असावें मिजाशींत त्यांच्या
धरावी भुई रोवुनीयां नखें
तुझी दक्षिणेची दिशादक्ष यात्रा
मला धावणें उत्तरेला सखे
तरी संधिकाळीं अशी भेट झाली,
नको ठेवुं सांभाळुनी ती पुढें
पुढें भेटणाऱ्या नदीच्या प्रवाहीं
वहा ही स्मृती,...ऐक हें एवढें

रूळांनीं मिळावें अनंतांत अंतीं
न शोभे तयां वाकणें वाकडें
झुकावूं नको देह झुलत्या पुलाचा
अशानें अपेशी पडे साकडें
इमानी असो सख्त पोलादगात्रीं
वहा दुःख तूं अन् मला वाहुं दे
पुढें भेटणाऱ्या पुलासारखी तूं
रहा ताठ गे अन् मला राहुं दे

रूळांना असो रूक्ष त्यांची निळाई
निरोपामधें एवढी दे हमी
नको आसवांचे खिळे जागजागीं
अशानेंच गे घात हो नेहमीं
रुमालावरी गंधगंधारधारा
मिळाला इशारा तुला अन् मला
तुला मार्ग तूझा मला मार्ग माझा
ध्रुवाचाच तारा...परी वेगळा...

संग्रहालय ... रा. क्र. 92608

## हे हुषार सावध डोळे

हे हुषार सावध डोळे   एकवार फसले होते
धीराचे शिल्पित ओठ   एकवार हसले होते.

ज्या वेळीं ठाउक असते   गणिताची सोपी रीत
ज्या वयामधें फाशांना   सारखी लाभते जीत
उघडतां मूठ ज्या वेळीं   उमटती नव्या धनरेषा
दोघांतिल संकेतांची   जन्माला येते भाषा
त्या वेळीं वाऱ्यावरती   पांखरू उडालें होतें
हे हुषार सावध डोळे   डोहांत बुडाले होते.

एकदां विलगली होती   खंबीर आजची जिवणी
जन्माला आलें नव्हतें   हें मौन असें अभिमानी
शिकवलीच नव्हती कोणीं   'जर-तर'ची माफक भाषा
हें जीवन जेव्हां होतें   जणुं एक अखंडित आशा
आज जें पडे मोजून   तें पाउल चुकलें होतें
हे हुषार सावध डोळे   एकवार चकले होते

ज्या नवख्या नवलस्पर्शें   पानपान होतें फूल
चांदणें उन्हाचें होतें   आपली आपणां भूल
फुटतात पावलांलागीं   जादूचे अल्लड पंख
सुखवतात नकळत जेव्हां   हृदयाला नाजुक डंख
त्या तसल्या सोनसकाळीं   हे ओठ उमलले होते
हे हुषार सावध डोळे   एकवार भुलले होते

# रात्र

पूल पूल जाळला   वाट वाट रोखली
शब्द शब्द पाळला   शर्थ शर्थ राखली

नांव गांव संपलें   घाव घाव लोपले
लाट लाट अंतरीं   मीं गिळून टाकली

पान पान फेकलें   फूल फूल टाकलें
अंतरांत रेखली   खूण खूण झाकली

दीस दीस धावलों   मी कुठें विसावलों
आंत भार वाहुनी   ताठ मान वाकली

श्वास श्वास फेसले   लोक हासहासले
लाख लाख सोसलें   राख-धूळ चाखली

गात्र गात्र सोललें   वार वार झेलले
दीर्घ दीर्घ संगरीं   मीं दया न भाकली

भोग भोग भोगली   जिद्द जीवनांतली
मात्र रात्रवारुणी   पात्र पात्र झोकली !

# हात

हे तुझे तळहात भोळे जाणती नाना कळा
अंगुलींना दिव्यचक्षू देह तों रातांधळा

हात हे होतात मौनी हात आंसू ढाळती
हासती, हेलावती वा हेच वेळीं जाळती

हे कधीं लाडांत येती, बोलती, बोलावती
मूकवाण्या सांत्वनानें अंतरीं ओलावती

या करांच्या अग्रभागीं मख्मलीची लेखणी
कोरिलीं अंधारलेणीं तूं कितीदा देखणीं

रूक्ष या तळव्यांवरी तूं बीज जेव्हां पेरलें
या नसांची वेल झाली आणि रक्ताचीं फुलें

## शपथ

खरेंच का खरेंच का
अजाण पावलाखालीं
मुडपले पांखराचे पंख?
खरेंच का खरेंच का,
एका स्वैर विभ्रमानें
कळीच्या मनामधें डंख?

अशी कां हिरमुसून
स्वप्नांतून परतली
माझी ही हासरी परी?
कशानें कशानें
विरघळून गेल्या ग
रेशमाच्या श्रावणसरी?

एकाच का क्षणानें
युगांना जाळावें
करावा माझा दुस्वास?
क्षुल्लकशा शब्दानें
घडावा दुरावा
एवढी का त्याची मिजास?

कधींच का कधींच का
जुळायचा नाहीं हा
भंगलेल्या शिल्पाचा घाट?
घनघोर अंधारांत
फुटायची नाहीं का
एकाहि दिशेला वाट?

माझ्या या पुतळीच्या
मुद्रांकित ओठावर
भाग्याची फुटो पहाट
नवस फेडतांना
द्यावें तें देईन मी
घ्यावें तें घेईन मुकाट

एकदाच एकदाच
परत घे परत घे
शापणारा तुझा निःश्वास
शपथ मी घेतों, पण
धूर्तांच्या शब्दावर
बसेल ना पुन्हा विश्वास?

# लेणें

'...किर्र किरमिजी गर्द तरुराजी तळ्याची फुटकी पाळ
दूर कुठें तरी दीपमाळेवरी दिव्यांची तुटकी माळ
कांटेकुंपणाशीं पाचोळ्याच्या राशी सर्सर धावते भीति
पावलोपावलीं बुडतां सावली थर्थर कांपते माती
वटवाघळांनीं पंखझावळांनीं लावली अंधारा आग
वडाच्या ढोलींत काळोख्या खोलींत पिशाचघूत्कारा जाग
डगमगणारी शिळा गोरीमोरी वेड लागलेली रात्र
झापड घालतें कोंडून ठेवतें उपडें आकाशपात्र...'

...अदृश्य हातानीं छिन्नभिन्न छिनी-हातोडी चालवी कोणी
किती तरी वर्षें उफराट्या हर्षें कोण हीं कोरितें लेणीं ?
पांगळ्या मनांत आंधळ्या क्षणांत उमटे लेण्याचें बिंब
जागत्या दुपारीं जळत्या बाजारीं घामानें कपाळ चिंब
मिटतां पापणी आंतल्या दर्पणीं जुळाया लागते माळ
...किर्र...किरमिजी...गर्द...तरुराजी...तळ्याची...
फुटकी...पाळ...

# चंद्रकोरीपरी कोवळें हासणें

चंद्रकोरीपरी कोवळें हासणें, पारिजातकाचे ओठ
आहे-नाहीं असें पापणीकांठाला लागलें काजळबोट
करपल्लवीला अशोकपानांचा नाजुक बसन्ती रंग
दक्ष वक्षावरी आस्तिक स्वस्तिक, सावध सांवळें अंग

अभिसारासाठीं जरा झगमग असूं दे धूसर वेषा...
यौवनाच्या उंच लाटांना कशाला बंदिस्त लक्ष्मणरेषा ?
सैरभैर वाटा निर्जन रानांत, मनांत वादळी हवा...
पंख फुलारून कधीं घुमायाचा घुमा हा माझा पारवा ?

कळी मौनमुग्ध, अनोखा सुगंध, राखणकुशल कांटा
तरीहि बुल्बुल चुंबून गेल्याचा होणार आहे बोभाटा
अशा क्षणासाठीं अक्षय पुण्याची करावी कुरवंडी सये
दान देतेवेळीं हिशेबठिशेब भल्यानें पाहूंच नये !

## आंधळा अंधार

आंधळा अंधार शेवाळी उतार तशांत तापल्या नसा
बाहूंत वेढून नको रे ओढून नेऊंस राजसा असा
अरे राजबन्सी तुझी राजहंसी पंजरपांगळी अशी
व्याकुळ होऊन उराशीं लावून नको रे पाडूंस फशीं

अज्ञात ऋणांत फसलें तृणांत मुकलें आकाशफुला
तापल्या तमांत करते मनांत तुझी मी मौक्तिकतुला
वादळ आवरी झालें मी बावरी नको ना घालूंस आण
टाकून कसासा उदास उसासा नको रे घेऊंस प्राण

माझी जीवखूण पडली गहाण बाकीचें सर्वस्व तुझें
अरे शहाण्यानें एका इषाऱ्यानें जाणावीं गहन गुजें
माझा तूं म्हणून तुझीच गणून सोड रे गुणाच्या राजा
तुझ्याच भोंवतीं करीन भ्रमंती अनंत जन्मांत माझ्या

आंधळा अंधार त्यांत शिळंधार पाऊस सुयांचा पडे
खोलांत पाऊल डोहाची चाहूल काळीज काळजा भिडे
क्षणैक थांबून एकदां चुंबून निर्दैवी पालथे हात
अंधार कापत आकाश झांपत जाऊं या दूर वेगांत

# क्षणाक्षणांची ताणलेली दोरी

क्षणाक्षणांची ताणलेली दोरी शब्दाशब्दांचे बाण
घे घेणार तर, कितीदां घेशील तूं शरणागताचे प्राण ?
मलाहि कळतें मी लाचार किती, तुलाहि तुझी शक्ति
क्षमेच्या स्मितांनीं कुरवाळतेस जखमा, हरवते अखेरची मुक्ति !

क्षणाक्षणांची ताणलेली दोरी, मणामणांचे पाय
'तोल सांभाळून जा' म्हणालीस, हें तरी शोभलें कीं काय !
अजस्त्र यंत्राच्या पट्ट्यापरी नदी सरकते माझ्याचसाठीं
कशाला कशाला अदृश्य हातांनीं दिलीस तूं हातीं ही काठी !

क्षणाक्षणांची ताणलेली दोरी, श्वासाश्वासांचा फास
उभें आयुष्य हा बळी जाणाऱ्याचा अखेरचा उरलेला तास !
डोळ्यांवर आहे ही अंधारी टोपी, जवळच दयाळू फळी
गोंधळून टाकणाऱ्या मुद्रेनें जगवलास अटळ झालेला बळी !

क्षणाक्षणांची ताणलेली दोरी, भिंवईभिंवईचा झुला
किती जन्म असें झुलायचें आहे—ठाऊक न मला न तुला !

# बंदी

मनुस्मृतीचें मणाचें ओझें
        हजारों डोळ्यांच्या सक्त संगिनी
हेंहि चुकवावें बंदीनें कधीं
        तोंच इशारा देते तर्जनी

अबोल ओठांच्या राजमुद्रेची
        ठेवावी लागते मुर्वत अशी
जरा धिटाई होतां भिडते
        करोल पापणी कर्वत जशी

मोहिनी मंत्राची एकच स्मृति
        चाळवी बंदीची सांखळी जरा
तोंच अडवितो अदृश्य परीघ...
        परीच्या बाहूंचा चांफेपिंजरा

केवढी प्रदीर्घ सोसावी सना
        एखाद्या दुबळ्या क्षणाच्यासाठीं
भैरव भविष्य पुढती उभें
        गतकाल ओढी कोरडे पाठीं

## ओढ

या पाण्याची ओढ भयानक
 नेइ अचानक डोहाखालीं
चुकूं लागले नाडीठोके
 अंगांगांवर गुंगी आली

तुला मला तें कळलें पुरतें
 डोहाजवळी आल्यानंतर
दो हाबांवर दोघें असुनी
 अलंघ्य झालें तेंही अंतर

उभय तीर तर हुकले आतां
 वाट उरे आवर्तामधली
कशास आतां दुबळा झगडा
 अर्धीमुर्धी घटका उरली

पृथ्वीवरचें पुण्य हरपलें
 स्वर्गाकडची चुकली परवल
कां नाहीं गे, कां नाहीं मग
 भोगायाचें अतल रसातल ?

## अरे, मी जाणते सारें

अरे, मी जाणते सारें आणि तरी शांत मी
निःशब्द ऐकते आहे अवघा आकांत मी.
फुंकरीनेंच पेटतें आणि जळून जातें माणूस
शब्दांतच काय आहे ? नको अशी गळ घालूंस.

अरे, विश्वास पटतो तेव्हांच नवें विश्व विकसतें.
प्रत्येक नव्या फुलाला कुठें नवें नांव असतें ?
दिवसा चुकामूक झाली कीं स्वप्नांत भेट होतेच
( जसें कांहीं कळतें आहे हें तुला नव्यानेंच ! )

जेव्हां तुझ्या भाळावर एक उभी शीर फुगते
मीच तर झुळूक होऊन गार हात लावून बघते.
अरे, उगाच मध्यरात्रीं जपमाळ घेऊन बसतोस
शेवटीं मींच थोपटल्यावर खिन्नखिन्न तूं हसतोस.

सोसतोंच आहोंत त्याच्या वर्णनाचा काय सोस ?
( आणि तरी नव्यानेंच तेंच तेंच विचारतोस ! )
अरे, मी जाणते सारें आणि तरी शांत मी
निःशब्द ऐकते आहे अवघा आकांत मी...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33529 विः काव्य
क्रमांक 9569 नों दि 28-11-82

## माझ्या सदाफुली फुला

माझ्या सदाफुली फुला
नको गाळूंस पाकळी
दूर असून जवळी
तुझी फिरते पाकोळी

केव्हांचाच झाला आहे
प्राक्तनाचा प्रातःकाळ
आणि इंद्रधनुष्यांत
गेलें बुडून आभाळ

तुझ्या हृदयामधून
उठे नागमोडी रेषा
तिची वीज वेगवती
भेदी माझ्याहि आकाशा

नको राहूंस पहात
चांदण्यांतला काळोख
तुझी तुझी म्हणूं किती
कशी पटवूं ओळख

माझ्या मुक्तपंख फुला
फुला माझ्या अंगणांत
नका फिरूं असहाय
काळ्यानिळ्या रिंगणांत

नाच नाच माझ्या मोरा
मत्त केतकीबनांत

तुझ्या डोळ्यांतली वीज
नाचे माझ्या गगनांत

इथें तिथें आणि तिथें
आहे तुझ्याच सांगाती
नको नको मागूं पुन्हा
पारिजाताची प्रतीति

घनदाट समुद्राला
आहे फुटलेला कांठ
कळालें ना ? अनंताला
आहे जवळची वाट

# कोडें

एक अक्षय निर्झरी
तृषा अखंड लावते
मुक्त हास्याची लकेर
माझे डोळे ओलावते

एक जाळणारी दृष्टि
अंधारांत निववते
शुद्ध सावध सोबत
प्रकाशांत भिववते

एक अनावर विश्व
संपुष्टांत मावणारें
बोल कठोर निग्रही
मृदु माया लावणारें

एक कुशींतला स्पर्श
दूर रहा म्हणणारा
एक दुःखित दुरावा
मला मिठींत घेणारा

एक जळणारा ग्रीष्म
पंचप्राण पालवतो
एक प्रकाशाचा बिंदु
माझेंपण मालवतो

एका वेड्या शहाण्याची
प्रज्ञा होते वेडीपिशी

एका शहाण्या वेडीची
तृप्त होते कासाविशी

माझ्या कोड्याचें उत्तर
माझें मला न सुटलें
साता जन्मांचे तरीहि
सारे संभ्रम फिटले

## अक्षय अलका

पुन्हा पुन्हा तूं बोल शब्द ते
ओत सुधा आसुसल्या पात्रीं
हे शिशिरांतक वसंतलक्ष्मी
फुलव फुलें तूं गात्रोगात्रीं

उमेदभर मीं झुंज घेतली
कारंजापरि काळिज उडलें
आज अखेरिस डाव संपतां
दान असें भाग्याचें पडलें

देहाच्या चिंधड्या उडाल्या
कुठें कुठें ठेवूं हा टेवा
मज गरिबाला सुवर्णनगरी
किती उशीरां दिलीत देवा !

चालूं दे बरसात गडे हो—
भिजव भिजव या औदार्यांनें
बुडव तुझ्या हृदयांत मला तूं
नको जिता ठेवूं लोभानें

युगायुगांतुन हा क्षण येतो
असा एकदा होउन उल्का
उधळा उधळा सुवर्णपुष्पें
अक्षय आहे तुमची अलका !

## छंद

आनंदी आनंद अहाहा आनंदी आनंद
चराचरांतुन दरवळतो हा नन्दनचन्दनगंध
गोड जाहले खारे आसू
दुखा:लाही फुटले हासूं
आज निवळल्या नैराश्यांतुन निथळे मधुनिष्यंद
अवकाशाच्या वेलींवरती
लाख अनोखीं फुलें बहरती
निबिड मनीं फूत्कारत फुटती धुंद केतकीकंद
कोटि कोटि या कांचनतारा
कापत गेल्या घन अंधारा
कणांकणांतुन उठल्या ज्योती जाळित जीवनबंध
आलिंगन चुंबन मावळलें
स्वच्छ चांदणें केवळ उरलें
अष्ट दिशांनीं आज न्हाणिला हर्षित गोपीचंद
जाळुन टाकित वेद पुराणा
झणत्कारला नवा तराणा
आज वेदनावीणेवरती फुले अनाहत छंद

## खांब !

उंच उंच या डोंगरलाटा
कंच कंच हा हिरवा सागर
वेढवेढत्या नागिणलाटा
एक तूं इथें भिल्लिण नागर.

पान पान हललें तुजसाठीं
फुलांसवें तर फुललिस तूंहि
एक नेक हा खांब विजेचा
तुझ्यासवें जो फुलला नाहीं.

तुझे कळे आधींच टपोरे
गुलबकलिका वरती ताठर
शेवंतीचीं कर्णकुंडलें
रानफुलांचे हातीं बिलवर.

घमघमलेली घेउन काया
जरा टेकलिस खांबावरती
तों सरसरुनी आली त्यावर
नवलफुलांची नवखी भरती !

# निसर्गांतल्या आदिशक्तीपरी तूं

निसर्गांतल्या आदिशक्तीपरी तूं, कशाला तुला मोजकीं धोरणें ?
जिचें शुद्ध अस्तित्व आनंददायी तिलाही कशाला गुढ्यातोरणें ? ?
जिथें तूं उभी त्या नभीं सांग कोठून येतात उल्हासऊर्मी नव्या ?
स्वयंसिद्ध लीला असे सृष्टिची जी तिला लाख लीला शिकाया हव्या ? ?

कशाला बटांना दटावीत येसी अनोखी तुरे मस्तकीं माळुनी ?
मनाच्या घनाचीं वितानें स्मितानें कशी टाकसी सांग प्रक्षाळुनी ? ?
जिथें सोनटक्का तरारून आला कशाला तिथें खोविलेली कळी ?
वसंतांतली बाग आली भराला भरीला कशाला शिळी पाकळी ? ?

जिच्या स्पर्शगंधामुळें धुंद आम्ही, उटी चंदनाची कशाला तिला ?
जलानें कशानें तृषा भागवावी ? हवीं अत्तरें का जुईच्या फुला ? ?
नभा रंगवाया हवी का निळाई ? कुणी वायुला काय द्यावी गती ?
दिवा तारकेच्या पथीं कोण लावी ? शिकावी कशी मन्मथानें रती ? ?
गडे तूं असावें...इथें...अन्...तिथें...अन् गडे तूं असावेंस माझ्या उरीं !
असो मी, नसो मी, असावेंस तूं गे निसर्गांतल्या आदिशक्तीपरी ! !

# तूं गर्भालस

तूं गर्भालस गौर केतकी धुंद धुकें भरलें नेत्रीं
पिऊन आलिस पुनव कार्तिकी चंद्र पुन्हा उगवे गात्रीं

नसानसांतिल शमलें वादळ विसावलें जळ डोहांत
एक भोंवरा गरगरणारा उरला झुलत्या देहांत
रसरसलेला सोन-लव्हाळा मिरवित राही निळे तुरे
शुभ्र घनांच्या जोडीवरती आषाढाची खूण उरे
थरथरते भिजलेली रेती पूर जरी नुरला पात्रीं
तूं गर्भालस गौर केतकी धुंद धुकें भरलें नेत्रीं

जडावलेल्या पायांखालीं सुखावते आहे धरती
तुझ्या तृप्तिची वर्तुळरेषा डुले झुले झूल्यावरती
कुजबुजतांना कांकण हिरवें, उठती वाऱ्यावर लाटा
दूर्वांवर जड पाउल पडतां फुटती तीर्थांच्या वाटा
तुझ्याभोवतीं पंख लावुनी फिरती कोजागिरि रात्रीं
तूं गर्भालस गौर केतकी धुंद धुकें भरलें नेत्रीं

मूर्तिमती तूं पहाटपूजा गाभाऱ्यांतिल तूं समई
तूंच फुलांची परडी झालिस फुलें वेचतां स्वप्नमयी
दहिंवरलेलीं उन्हें नेसुनी जातां हे दंवबिंदुसुखि !
मज पाप्याची नजर निवावी ही किमया घडते नवखी
देवालाही असेल आई ही पटते तेव्हां खात्री
तूं गर्भालस गौर केतकी धुंद धुकें भरलें नेत्रीं

## विषकन्या

नागाच्या वळशांचे कुंतल
कांती दाहक थंड हिमानी
काजळगहिरी लाल लालसा
विषांत भिजल्या वक्र कमानी

गळफासापरि आतुर बोटें
वेळूच्या अग्रांसम लवचिक
उंच निमुळत्या नखशूलांवर
सुकलेल्या रक्ताची तिकतिक

शब्दांमधुनी उधळित गंधक
स्मितांत पेरित चंचल पारा
पदराच्या पंख्यानें फुलवसि
मनामनांतिल पापनिखारा

विषकन्ये! चल घेउन ये तर
स्फटिकाची ती सुरई घातक
कंठजाळत्या बिंदूसाठीं
अधीर झाला आहे चातक!

## गोष्ट

गालगुरोळी फुगून बसली
आजोबांच्या मांडीवरती
टपोर डोळे मोठे झाले
घुसळण खेळत खांद्याभंवती...
गोष्ट हवी हो, गोष्ट हवी
सांगा, एकच नवीनवी.

आजोबांच्या मनांत अंधुक
आलेगेले राण्याराजे
टकलावरच्या रेषा पाहुन
प्रधानकन्या नाजुक लाजे...
ही तर ठाउक, तीहि जुनी
एक नवी सांगा अजुनी.

ढगाआडच्या चंद्रमुखावर
अर्धी अंधी टाकुन दृष्टी
मिणमिण कंदिल जवळ ओढुनी
वात उजळली त्याची कष्टी
आणि म्हणाले आजोबा,
ऐका, छळूं नका बाबा

आटपाट नगरांत एकदा
रहात होती अल्लड राणी
—मधेंच पुसलें आजोबांनीं
मिचमिचणारें खारें पाणी...
...सांगा, झालें काय पुढें?
आजोबांची जीभ अडे!

उद्या सकाळीं आहे शाळा
चला पळा रे झोपा आतां.
गालगुरोळी, टपोर डोळे
आंत पळाले बघतांबघतां...
आजोबांचा स्वर ओला
गोष्ट सांगतो चंद्राला !

# तुझे अधू अधू डोळे

येती अंधाऱ्या वाटेनें
जेव्हां जेव्हां माझे पाय
तुझे अधू अधू डोळे
शोधतात तरी काय ?

उत्साहाच्या रेशमांत
मला वेढितों सारखा
तुझे अधू अधू डोळे
सफा ओढती बुरखा

संवयीच्या सुखासाठीं
आवळतां माझीं बोटें
तुझे अर्धओले डोळे
चीत्कारती...खोटें खोटें !

तुझे मंदमंद डोळे
त्यांना प्रकाशाची गति
दूर पळावें कितीहि
तेथें आधींच पोचती

कधीं तुझ्या घातासाठीं
जरी मांडला सापळा
तरी शकुन सांगतो
अधू डोळ्यांचा पिंगळा

तुझे अधू अधू डोळे
यमुनेचे भग्न कांठ
माझ्या कृष्ण-पापांसाठीं
उताराची पायवाट!

# जिना

कळलें आता घराघरांतुन
नागमोडिचा जिना कशाला
एक लाडकें नांव ठेवुनी
हळूच जवळी ओढायाला

जिना असावा अरुंद थोडा
चढण असावी अंमळ अवघड
कळूनही नच जिथें कळावी
अंधारांतिल अधीर धडधड

मूक असाव्या सर्व पायऱ्या
कठडाही सोशीक असावा
अंगलगीच्या आधारास्तव
चुकून कोठें पाय फसावा

वळणावरती बळजोरीची
वसुली अपुली द्यावी घ्यावी
मात्र छतांतच सोय पाहुनी
चुकचुकणारी पाल असावी

जिना असावा असाच अंधा
कधिं न कळावी त्याला चोरी
जिना असावा मित्र इमानी
कधिं न करावी चहाडखोरी

मी तर म्हणतों–स्वर्गाच्याहि
सोपानाला वळण असावें
पृथ्वीवरल्या आठवणींनीं
वळणावळणावरी हसावें...!

# लाखदा माझ्या मनाला

लाखदा माझ्या मनाला सांगतों समजावुनी
त्या जुन्या साऱ्या स्मृती तूं टाक आतां जाळुनी
तें तरी हट्टी असें—तेथेंच तें जातें पुन्हा
जेथ मर्दांच्या मुठींतिल खड्ग हा नव्हता गुन्हा
शुभ्र रोमांचांत जेव्हां ताठण्या सामर्थ्य होतें
कुंकवाला रंग होता कंकणांना अर्थ होते
लाल ओठांतून जेव्हां जाळता अंगार होता
संगराची वीरशय्या हा जिथें शृंगार होता
लाज लाचारीस होती अन् भुकेला भीड होती
नाडिच्या ठोक्यास जेव्हां नाडल्याची चीड होती
वेड कांहीं वेगळें या मानवी देहांत होतें
अन् अडाणी मस्तकाला वाकणें अज्ञात होतें

तें खरें माझ्या मना—पण आज कॉफी छान आहे
आखल्या रस्त्यावरी या बंगल्याला शान आहे
या विजेच्या दीपकाचें तेज मोठें शांत आहे
पारव्या भिंतींत आतां पारवा एकांत आहे
औटहाती मोटक्याला साजणारा थाट आहे
लोकरी कोटास माझ्या ऊब आहे घाट आहे
पंचखंडांतील वार्ता सांगते आकाशवाणी
आणि रंभा–ऊर्वशींच्या दर्शनाला चार नाणीं
शेक्स्पिअरशीं सख्य आहे, शॉहि माझा मित्र आहे
सोबतीला शोभणारें तें जपानी चित्र आहे
मोजलेली चाल आहे, मापलेला पंथ आहे
बर्‌गड्यांतिल पांखराचा शब्द आतां संथ आहे

तें म्हणे सारें खरें...पण बोलणें आहे वृथा
वेगळ्या होत्या कथा त्या वेगळ्या होत्या व्यथा
तापलेली शृंखला जों आपल्या हातांत होती
मुक्त गाणाऱ्या गळ्याला काचणारी तात होती
खोल ओला काळजाला जाळणारा वार होता
तोंवरी पायांतल्या या साखळ्यांना भार होता
लाल तृष्णा लागलेल्या मातिचें आह्वान होतें
पंचकल्याणी खुरांना दौडण्याचें भान होतें
आस होती आंसवांना भावनांना श्वास होता
गाढ अंधारांत तेव्हां भास्कराचा भास होता
दीपवेड्या पाखरांनीं हासुनी जेव्हां जळावें
तेधवां मृत्युंजयाशीं मातिचें नातें जुळावें

जा गड्या हट्टी मना—जा पंख हे विस्तारुनी
त्या पहा गुंफा पुराण्या लोचनें विस्फारुनी
तीन फेऱ्या घाल जा त्या लाल भिंतीभोंवती
चुंब तीं बुंदेलपुष्पें ती सतीची संतती
तो पहा ओढा जिथें घोडा उडाया ना सजे
आणि माती मानिनीच्या मर्द रक्तानें भिजे
कोण त्या वृक्षातळीं तें...? हाय जे गेले सुळीं
घेइ नेपाळी तराई राजसिंहाचा बळी
ती पहा गंगाकिनारीं शुभ्र दाढी हालते
आणि तुट्क्या मन्‌गटाची आहुती हेलावते
मात्र तूं येशील जेव्हां परतुनी देहाकडे
शांतिपाठी पोपटा घालूं नको रे सांकडें !

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92684
शाखा (स्थळ

# पक्षी

वंशवनाच्या कोशामधुनी
उसवुन आणुन रेशिमधागे
अवकाशांतच आंखुन रेषा
जरा विणावे आगेमागे
अश्वत्थाच्या उलट्या स्कंधीं
कांहीं उलटे कांहीं सुलटे
अनंत आत्म्याभंवतीं तेव्हां
दीड वितीचें घडतें घरटें

असाच तूं अन् असाच मीहि
असेच असती सारे पक्षी
मात्र मला प्राणांहुन प्यारी
कंठावरची काळी नक्षी
या नक्षीचे स्वर उलगडतां
गडबडतो अश्वत्थ पुराणा
माझ्या घरट्यामधून घुमतो
गूढ अनामिक तीव्र तराणा...

...कुठला पक्षी ? कुठलें घरटें ?
सुलटा होतो वृक्ष सनातन !
हरलों म्हणती ब्रह्माहरिहर
पुन्हा लावती पिंपळ नूतन !!

[ Poet is a queer bird—Karl Marx ]

# पिंपळ

कृशांगुलींनीं कमळें कोरित
उभा एकला पिंपळ मौनी
आभाळाची निळी प्रार्थना
पिऊन घेतो मिटल्या नयनीं

सॉक्रेटिसचा पेला जहरी
हासत नाचत मीरा प्याली
शेष त्यांतला झुळांत भिनतां
पोपटपानें पिवळीं पडलीं

विषण्ण बकुळी समीप बसली
ती बघते...हा मीलित मौनी
पर्णहीन पुरुषोत्तम केवल
इथला नोहे इथें असोनी

मिटली काळी जानेवारी
तुटले वैराग्याचे बंध
आणि तरीहि झपाटतो हा
कृशांगुलींचा मुक्त समंध

[ सेवाग्रामला महात्माजींनीं लावलेला एक पिंपळ आहे; आणि कस्तुरबांनीं लावलेली एक बकुळी शेजारींच उभी आहे.]

## पंजा

या दमलेल्या देहावरती
काळोखाचीं वजनें काळीं
मावळतीनें आवळलेलीं
हीं काळीं कांटेरी जाळीं

गारेच्या काचेंतुन बघती
थिजलेले मेणाचे डोळे
अंधारामधिं अधीर बसलें
झापडपंखी गिधाड काळें

मिटूं लागले गज लोखंडी
करकरला काळा दरवाजा
सावट आलें...सावध झालों...
तों आवळला काळा पंजा !

## सावली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स
अनुक्रम 33521 विः
क्रमांक 9549 नोंः दिः

भाद्रपदांतिल घन अंधारीं
करकरणाऱ्या माझ्या दारीं
चाले उलट्या चोरपावलीं
निराकार अदृश्य सावली
शेवाळाचीं नखें लावलीं
डोळ्यामधली फुटे भावली

छप्पर पडतें अंगावरती
सुळापरी हो निष्ठुर धरती
शिशापरी जड जिव्हा बरळे
काळिज जातें गोठुन गरळें
अंधाराची शोधित कूस
हातच माझे होती क्रूस

बुबुळांवरचा झटकित पारा
लुचूं पाहतो घन अंधारा
करवतणाऱ्या रातकिडयांची
कानांवरती येते कुंची
कवेंत घेउन छाया तीच
मुखीं अफूचें बसवी बूच!

## गंधभरी

आज जुईच्या कळ्या-कळ्यांनीं रात्र घडविली गंधभरी
क्षणाक्षणांतुन भरुन ठेवले चंदनकण हे कुणीं तरी

निंब्रावरचा चुंबुन मोहर चिंब झुळुक हो वाऱ्याची
कृष्णकमळ उडवून चालली लुकलुक लोलुप ताऱ्याची

त्यांत तुझी सायलिची मलमल तुला न कळतां ओघळली
बघतां बघतां वेल दंवाची चांदण्यामधें विरघळली

मोहफुलांचा वास अनावर मातीच्या रंध्रांत भरे
कवेंत घेत्या आकाशावर केतकिची बाधा पसरे

नटमोगरिच्या कळ्या सुईच्या तरारल्या अंगावरती
थरारल्या देहावर आली चंचल चांफ्याची भरती

वक्षावरती बकुळ-आसवें निवल्या पंखांतुन गळलीं
गजरेमिठिची सैल सांखळी पहाटभर कंठीं उरली

# मोर

सावळतीच्या गहन निळीनें
गहिरा केला दुबळा बांधा
शंभर डोळे देउन देवा
तुम्हीं फसविलें मज जन्मांधा

इंद्रधनूची करून चोरी
निळकण्ठाला दिलात कण्ठ
आंत ठेवुनी कर्कश कर्वत
तुम्हीं बुडवलें मज आकण्ठ

तरी क्षमा मीं केली असती
जरी लाभते तल्लख पंख
लाख पिसांच्या ओझ्याखालीं
आत्म्यावरती केला डंख

येते वर्षा जाते वर्षा
उन्मादाचें करतों ढोंग
दुडक्या चरणीं सांभाळावें
विहंगमाचें अवघड सोंग

## बाग

माझी बाग रुपेरी जेथें स्वप्नफुलें सोनेरी
अंधुक वाट धुक्याची वरती कापुरकण चंदेरी

मावळतीच्या घाटावरुनी
सांध्य जळाच्या लाटांवरुनी
एकांताच्या वाटांवरुनी होते तेथिल फेरी

कांट्याविण केतकिचें कुंपण
स्मृतिकलशांतुन चंदनशिंपण
पसरुन बाहू अपुले आपण मीच मला सामोरी

इंद्रधनूच्या पुलाखालुनी
आत्मसुखाचें वाहे पाणी
त्या पाण्यावर हंसी कोणी सोडी गीतलकेरी

शल्यांवरती हसती कलिका
मनोरथांच्या विहगमालिका
सुखदुःखांच्या दोन वल्लिका विणती गोफ दुहेरी

आसूंचे दंवबिंदू पिउनी
पारिजात फुलला तरतरुनी
शैशव-यौवन सीमेवरुनी रुजतों मीच अखेरी

## हिमालय

स्वप्नगर्भ निद्रेतुन उमलली पहाट
विजेपरी लवलवला पापणिचा काठ
दूर उभे अवगुंठित घाटशून्य घाट
अंतरांतुनी फुटली उत्तरेस वाट

जन्मजन्म वाटचाल जरि करितो यात्री
कळ अजून फिरण्याची शिणलेल्या गात्रीं
घरट्यांतच दचकुन हो पक्षी हा जागा
फडफडती पंख उगा मग उत्तर-रात्रीं

कावेरी-संगमांत, कृष्णेच्या डोहीं,
गोदेच्या भोंवऱ्यांत, रेवेच्या गेहीं
गंगेच्या पात्रीं अन् यमुनेच्या नेत्रीं
गूढ रूप हिमगिरिचें प्रतिबिंबित होई

मातींतच या रुजते शिखरांची माया
पाळण्यांत बिलगतसे भंवरा या पायां
रक्तांतुन वाहतसे मानसिंचें पाणी
स्वप्नांवर ढाळितसे धवलगिरी छाया

अर्ध्यावर टाकुन मग कुजलेला डाव
घेतो हा देवदत्त उत्तरेस धाव
उंच दाट गह्वरीं हा नाहींसा होतो
परतीरीं एक रिती डुचमळते नाव

माळाच्या मर्यादा जेथ संपतात
काळाच्या नाडीचे ताल थांबतात

वृक्षांना पक्ष्यांना नुरति जिथें नांवें
त्या तिकडे दूरावर उभे तुम्ही तात

उंच किर्र घाटांतुन सरपटती मार्ग
बुजल्यावर ते पुढती हाकेवर स्वर्ग
मेघांची रेघ नका ओलांडूं कोणी
पंजरामधें पकडिल हा कांचनदुर्ग

दाराशीं टक लावुन बघति देवदारू
चित्रलिपी जादूनें पाहतात भारू
त्यांच्या त्या अग्राशीं...सावधान...ऐका
खिंकाळे माझ्यास्तव एक निळा वारू

याच निळ्या वारूला आकळतें सारें
शिखरांशीं करिति काय कानगूज तारे
कैलासावर फिरती केव्हां शिवगौरी
कां मानसलहरींना चुंबितात वारे

याच निळ्या वारूवर होउन आरूढ
सात दालनांत फिरे मी मोहुन मूढ
पृथ्वीचा मानदंड मापियला जेव्हां
हिमयुगांत सृष्टीचें उलगडलें गूढ

इंद्रधनू सुरुमांतच या मुरलें आहे
बीज इथें शिशिराचें स्फुरलेलें आहे
मेघांच्या कापसांत हीं अनंतरत्नें
रंगांचें मूळ ज्यांत भरलेलें आहे

नीलवर्ण आभाळा चुंबित गिरिमाला
नीलवर्ण होते हें ठावें कवणाला ?
पाचूचें हो माणिक सोन्याची चांदी
हिमबिंदू होति हिरे ज्ञात न जगताला

एकदां असाच उभा होतों गिरिकुहरीं
भरतीला आलेल्या धरतीच्या लहरी
चंद्रकोर डुचमळते फेनफुलांपाशीं
इंद्रधनूवर नूतन एक छटा गहिरी

पुढति उभा बैरागी भस्मावृत नंगा
'वूलर'चें तीर्थ पदीं, शिरिं कांचनगंगा
तें अद्भुत पाहतांच–झपाटुनी गेलों
घुमला घुमटांत तदा प्रश्नांचा पिंगा

'कोण मी ? कसा ? केव्हां ? कुठुनी अन् कोठें ?
कां म्हणून ? काळ किती ? काय खरें ? खोटें ?'
या प्रचंड भूलहरी अणुहुन अणु झाल्या
आणि अणूला दिसलें आत्मरूप मोठें

तेंहि निळ्या वारूला अवघें आकळलें
पंखांचे पर अवघे फिरुनी सळसळले
उंच उंच उंच उडे गगनांतुन सात
जेथें स्थिर मेरूचें मस्तक झळझळलें...

## उर्वशी म्हणाली पुरूरव्याला

उर्वशी म्हणाली पुरूरव्याला
अजून आहे थोडा अवकाश
चालला आहे सूर्य अस्ताला
बुडालें आहे अर्धें आकाश
आली न भरती अंधार-जला

थोड्याच वेळानें वळणावरी
आकाशगंगेच्या दोन्ही काठांना
लागेल पेटाया एकेक तारा
मानवी वेडाला भुलून इथें
राहून जाईल एक अप्सरा

खरें सांगतें तुला म्हणून...
रात्रीचा चषक झोकल्यावरी
मलाहि माझें न उरतें भान
परंतु स्वर्गाला शाप आहे हा...
...नाहीं देतां येत सर्वस्वदान

शैशवापासून शिकलों आम्ही
जरा खेळावें जरा चुंबावें,
जरासा करावा नाजुक डंख
जरा खुलावें जरा खुलवावें
जरासे मिटावे—खोलावे पंख

हेंहि सांगत्ये तुला म्हणून...
उदंड कौमार्य लाभलें त्यांचा
इतुकाहि कोठें जडतो जीव

अरे ज्या स्वर्गांत नित्य चांदणें
तिथें फुलेल का पुरें राजीव ?

अरे राजसा ! विद्ध मृगसा
भरल्या डोळ्यांनीं पाहुं नको रे
एकदा तरी तूं विश्वास ठेव
सुखाच्या पेल्यांत दुःख पाजावें
देतात मंत्र हा आम्हांला देव

परस्वाधीन पऱ्यांचें जिणें
पापाची पुण्याची नाहीं त्या मुभा
सुबक दिसावें हसावें गोड
कशी सापडेन हातांत तुझ्या
अभ्रवेलीचा या हट्ट तूं सोड

पहा लोटतो वरून पूर
लागलीं मिटाया स्वर्गाचीं दारें
कापूर होऊन जळे अवकाश
काळोख्या अग्नीची पेटली चूड
करपूं लागला संधिप्रकाश

पंख शिशापरी होतील जड
होतील शृंखला लाडिक हट्ट
तुझ्या भुजांचे पाश बळकट
अशा आर्जवांच्या खिळ्यांनीं राजा
चित्राला जडेल जड चौकट

तूंही श्रमांत श्रमशील सख्या !
अरे ऐक ना...ऐक म्हणते
नको नको नको उचलूं सुख
नको रे सर्वांगीं लावूंस ज्योती
आवर आवर सुगंधी सुख...

## स्वप्नामधुनी जरा दूर व्हा

स्वप्नामधुनी जरा दूर व्हा माझ्या राजेश्वरा
उत्तररात्रीं विझल्या गात्रीं खिळलें पतिमंदिरा
विझून गेली अवघी अवनी
मौन तेवतें माझ्या भुवनीं
अधांतरीं तरि खिरत राहतो स्वर ओला कांपरा
डोळा लागे कुठें जरासा
तोंच तयावर सोनकवडसा
माझें घरटें झुलतें उलटें आभाळीं उंबरा
संसाराची भाग्य-भावली
उभी दिसे जरि ठाम् पावलीं
नका धका हलकाही लावूं थरथरतो चौथरा
नका म्हणूं कीं घेत निवारा
मैना भुलली उंच मिनारा
पंख कापले तरि मैनेचा डळमळतो पिंजरा
म्हणून म्हणते स्वप्नसाजणा
पुसून टाका अंधारखुणा
पहा भडकली ज्योत केशरी पूर्वेच्या झुंबरा

# लावणी–शीतळ सौदामिनीची

वैशाखाच्या उन्हांत फिरते पौषांतिल यामिनी
मनामनाला वणवा लावी शीतळ सौदामिनी

चोळीसाठीं हिनें घेतलीं पांगाऱ्याचीं फुलें
हिरवा वारा पदर होउनी हळव्या अंगीं झुले
साळीच्या ओळींत मधें हें शेत तिळीचें खुले
हिला पहातां होति शहाणीं वय सोळांतिल मुलें
तरी फिरे बेभान अशी जणुं निष्कामा कामिनी
मनामनाला वणवा लावी शीतळ सौदामिनी

उजळ गळ्यांतिल पोत काजळी जळतो मधला मणी
गोऱ्या आभाळांत झळकते काळी तिळचांदणी
रूपालागीं भिडलें यौवन येथें रतिरंगणीं
असेल अस्सल तोच टिकलू रे असल्या समरांगणीं
कशी घुसे लाखांच्या हृदयीं असुन अलसगामिनी
मनामनाला वणवा लावी शीतळ सौदामिनी

खबरदार हिज छेडुं नका कुणि, होइल ना बावरी
कुणी चतुर कां कधीं पिंजतो अशी रेशिमसांवरी ?
असे जगाचे दिवस सुखाचे आहेतच कुठवरी ?
ही आहे तों तिळसाखर तरि फुलेल अंगावरी
सदाविकासी कशी उगवली भुइवरतीं पद्मिनी
मनामनाला वणवा लावी शीतळ सौदामिनी

# लावणी–मुंबइच्या मनकर्णिकेची

मुंबइच्या मनकर्णिके, नेसुनी फिकें वसन हें गहिना
तूं जातिस कोठें अशी गडे भर दिशीं, उन्हाचा महिना

तलखीची चिकचिक हवा, त्यांत मी नवा, जीव घाबरतो
भाबडासाबडा सांब, राहुनी लांब तुजकडे बघतों
गर्दीचा दर्दी कुणी हिकमती गुणी जवळ घुटमळतो
असूकारा पाहुन असा, जिवाचा ससा भेदरुन पळतो
तूं तल्लख पुरती खरी! चाबकापरी फिरवसी नयना
तूं जातिस कोठें अशी गडे भर दिशीं, उन्हाचा महिना

उचलून उंच कुंतलां, मोरकुंचला बांधला वरती
ही चोळी थोडी थिटी, तुझी बळकटी दाविते पुरती
हा अंचल चंचल गडे वायुवर उडे, नेत्र भिरभिरती
टाचेंत उचलले बूट घालती कूट, गोंधळे धरती!
ही फैनाबाजी अशी ग शिकलिस कशी उडवण्या दैना
तूं जातिस कोठें अशी गडे भर दिशीं, उन्हाचा महिना

चित्राच्या छत्रीमधुन चित्र तूं बनुन लगबगा जाशी
मी साधाभोळा कवी, तऱ्हा तव नवी कळेना मजशी
जरि सांज दूर राहिली तरी उमलली कशी गुल्बशी!
सोन्याची बावनकशी घडवली जशी कुणीं उर्वशी!
भरमाध्याह्नीं उतरली चोरपावलीं चांदणी रैना!
तूं जातिस कोठें अशी गडे भर दिशीं, उन्हाचा महिना

## लावणी–चौरंगाची

मांडला गडे चौरंग, जमवला रंग, उठा श्रीरंग ! लागल्या भुका
झाला उशीर आधिंच असा, अहो राजसा, थोडें तरि हसा विसरुनी चुका

तुम्हि अतिथी आलां तिथि साधुन नेमकी
रसनेची तुमच्या रुचि मजला ठाउकी
मी करीन सेवा करुन मनासारखी
उघडा तर जड पापणी, करत्ये विनवणी, जागतेपणीं लुटा रससुखा

केळीचें कवळें पान शिरा घनदाट
वर सोनमिन्याचें तिळनक्षीचें ताट
नवलाचा रस सातवा वाहतो पाट
वाढली रुमाली घडी, करा तांतडी, सोडा ही अढी, घडी जाय फुका

दुधमांडे भरविन गडे गोड अल्वार
हा खवा नरम तांबूस देते हळुवार
विरघळुं दे ओठीं द्राक्षांचा रसभार
लावून वर्खकेवडा, दुमडुनी कडा, बहुगुणी विडा लावते मुखा

न्हालेल्या केसांवरून चालत या हो
या जरिपदराचा वारा झेलत या हो
तुम्हि डाव्या नयनीं उजवें बोलत या हो
राघु कां राहिला मुका, करा बोलका, रागवूं नका, करा कौतुका

## लावणी–राधिकेची

राधिके ! तृषित सारिके !
प्राशिला सुखें कृष्णप्याला
तो भिनला भिनला भिनला !

कोणत्या क्षणीं काजळी
उतरलीस काळ्या जळीं
कां प्यालिस भोळ्या मुली विषारी अनला !
तो भिनला भिनला भिनला !

स्वर अधरांवरती अडे
पाऊल वाकडें पडे
घामानें अवघा गडे देह रुमझुमला !
तो भिनला भिनला भिनला !

गात्रांवर झुलती रात्री
परि पहाट फुटली नेत्रीं
यमुनेच्या गहिऱ्या पात्रीं मोहन मिनला !
तो भिनला भिनला भिनला !

तूं विषांत विरशिल आतां
मुरलींतच मुरशिल आतां
हा प्रपंच अमुच्यापुरता राधे उरला !
तो भिनला भिनला भिनला !

# लावणी–अबोलीची

तूं गडे अबोली अशी, शालु गुल्बशी, सुरंगी गजरा
झोंबल्या तुला ग भल्याभल्यांच्या नजरा

डोळ्यांत खेळतें अक्कड पाणी तुझ्या
गोटोळया गोऱ्या फक्कड दोन्ही भुजा
कां कांचोळीला सख्त जाहली सजा ?
बुरुजांत पहारा करी मदन या प्रहरा

पेटवी असूया वक्षावरचा हार
शेखींत मिरवतो आपुलाच आधार
छेडती कंकणें तप्त कांचनी तार
गे काळजांतल्या ऐक कांपऱ्या गजरा

निरखीत भुईवर रेखिव निज साउली
तूं कोरिव पुतळी उभी दीड पाउलीं
कशि प्रळयलाट या औट हातिं मावली ?
गरिबांनीं आम्हीं दुरून करावा मुजरा

चाचपीत अपुल्या मणिमंगलसूत्राला
तूं धाक घालसी धिटावल्या नेत्राला
कधिं दृष्ट न लागो अमुची या चित्राला
ओवाळुन टाकूं जीव तुझ्यावर बुजरा

# तान्हें

रंधा अंधारा मारीत
आलीं सकाळचीं उन्हें
आणि त्यांनीं जागें केलें
तुझें जग तान्हें तान्हें

बाळमूठ स्तनांवर
विनावळ आवळली
अर्ध-जागल्या डोळ्यांना
कळ अर्धी आकळली

मनामधें पसरलें
चोरचांदणें लबाड
आणि भारावून गेलें
जुनें बकुळीचें झाड

तान्ह्या तान्ह्या आठवणी
त्यांच्या दंशहीन खुणा
किती छळशील राजा !
म्हणालीस सांग कुणा ?

## हिशेब

कांहीं क्षण जपलेले
कांहीं क्षण लपलेले
कांहीं क्षण मखमाली
कांहीं खोल खुपलेले

कांहीं क्षण हरपले
कांहीं आंत झिरपले
उकळणाऱ्या मुशीमधें
कांहीं क्षण करपले

कांहीं क्षण गाण्याचे
कांहीं दूर जाण्याचे
कांहीं क्षण...कांहीं क्षण
पापणीमधल्या पाण्याचे

कांहीं क्षण वाऱ्यासाठीं
कांहीं ध्रुवताऱ्यासाठीं
कांहीं क्षण आभाळाला
कांहीं चिमणचाऱ्यासाठीं

कांहीं क्षण कांहींचेच
कांहीं कांहीं-नाहींचेच
कांहीं क्षण रुक्मिणीला !
कांहीं केवळ राहीचेच !

कांहीं क्षण अधिक आले
कांहीं कांहीं वजा केले
हातचा एक हवा होता
तेवढें मात्र राहून गेलें !

## ऋण

उदारांनीं चढाओढी वाढवलीं देणीं
सारीं गहाण पडलीं माझीं बाळलेणीं

केली उधळमाधळ सरे सारें कांहीं
यात्रेसाठीं पुंजी हातीं उरलीच नाहीं

अंतीं धांवाधांव होतां लक्ष्मी जागी झाली
आला कांचनाला पूर माझ्या अंतकालीं

घेतल्याची केली जरी दिडाईनें फेड
तरी ऋण फेडण्याचें बळावलें वेड

देणें देतां देतां आतां सरे चक्रवाढी
आतां माझ्या ऋणामधें आहे भावी पिढी

## यात्रा

असंगाशीं संग आतां
कशासाठीं बांधाबांध
ऊठ ऊठ सईबाई
शेवटला घास रांध

एका अवतारामधें
तृप्त केलीं दहा नातीं
आतां उत्तरयात्रेंत
नको कोणीहि सांगाती

पंथशून्य यात्रिकाला
नको दुपेडाची दोरी
भूक भुकेनें भोगावी
आतां कशाला शिदोरी

माझ्या मनामधें आहे
माझी भगवी कफनी
पाण्यासाठीं सदा सिद्ध
माझी भरली पापणी

अशा महायात्रेसाठीं
आहे मोहरली मही
ऊठ ऊठ सईबाई
घाल हातावर दही !

## रात्र : झेलमच्या बागेंत

थंड बदामी ऐषारामी मत्त मोगली रात्र
जिथल्या तेथें झिंगत झुलतें अमली झेलमपात्र

अवघें अंबर झालें झुंबर अत्तरगंधित तारे
गीत इराणी गाती कोणी धुंद अफीमी वारे

घुमटकिनारीं उमटे न्यारी चित्रचिनारी नक्षी
अंधाराचा सुरमा झिरपे जाळीदार गवाक्षीं

तलम धुक्याच्या पड्यामागें लखलखती खंजीर
वल्हीं चुबकतां खोल भुयारीं खळखळते जंजीर

लाटा लाटा चोरलवाटा परवल चुंबन एक
जर्द जांभळा घुंघट घेतां बेगम हो बिनधोक

मोरतुऱ्याचा तोरा मिरवित माझा जाय शिकारा
गतजन्माच्या कबरीमधुनी झाला एक पुकारा

मादक आली याद पुराणी, दुःख उडालें बुका
दुनिया गेली जन्नम्‌मध्यें ! मालिक ओढी हुका ! !

## रात्र : बिआसच्या रानांत

उभा एकटा
नभांत लावुन दृष्टि
अंधारांतच
जवळ सरकते सृष्टि
देश अनोखा
नवखा ओला वारा
मिणमिणणारा
कोमट एक निवारा

घाटामधले
चुकवुन वेडे वेढे
रुसून बसलें
लुकलुकणारें खेडें
या शिखराची
त्या शिखराला बांग
पुन्हां झोपते
कुशी बदलुनी रांग

ओलेत्यानें
उभीं कांपरीं रानें
रोमांचांपरि
झाडांचीं सुइपानें
दूर वितस्ता
पाताळांतिल गंगा
तिचा फवारा
चुंबुन गेला अंगा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स
अनुक्रम 33529 वि: 
क्रमांक 9543 नोंद दि:

मी इथला
कीं तिथला एक प्रवासी ?
कुठला राजा ?
कीं केवळ वनवासी ?
चुकवुन आलों
कुठला सक्त पहारा ?
छातीवरतीं
झेलाया ध्रुवतारा ?

तेथें असतां
हांक अशा स्वप्नाची
येथें वसतां
ओढ पुन्हां मुलखाची
रात्र काश्मिरी
पांखर घालुन वक्षीं
कोंडुन ठेविल
असला चंचल पक्षी ?

सुखावुनी मग
म्हटलें मींच स्वतांला
या शिखरांतच
तूं जन्माला आला
पुन्हां एकदां
कर देहाचें पात्र
शोषुन घे ही
मायउबेची रात्र

# रात्र : पहलगांवच्या पहाडांत

लिदार ! लाडकी महापुरुषाची उनाड नात
पळे भिंगरींत शिळा घुमवीत नव्या रानांत

अशी लवे कधीं तशी लवे कधीं कोंवळी ज्वानी
इथें घुमी अशी तिथें घुमे तशी सुयांच्या पानीं

येतां वाऱ्यावर एक काळीशार पहाडी छाती
कशी हिमजड नाडी थडथड उडाली हातीं

ओल्या काळोखांत वेड्या विळख्यांत ओळख पटे
तेढ्या प्रणयांत चढ्या आवेगांत लिदार पेटे

शय्या सुईसुई काया थुईथुई उध्वस्त वेष
उगा चांचपीत निघे अर्धभीत भांगाची रेष

इथें त्याचे हात तिथें त्याचे हात जायचें कुठें
सारें शांत शांत तरी आंत आंत वादळ उठे

अंधार ढोलींत पारव्या शालींत कोण हाललें ?
जीर्ण पुरुषाचे जर्द जवसाचे डोळे किल्किले

संजाबामधल्या केसांना पिकल्या देऊन गांठ
कांसोटा कसून नीटस नेसून कवंतकांठ

आजोबा निघाले, डोळ्यांपाशीं हाले फिका कंदील...
इथें मिठी तुटे दूर पळे कुठें निळा मंदील

गांवाला वळसा घालून म्हाळसा घरांत चूर
निजते थिजून तरीही अजून धपापे ऊर !

*किन्नर-किन्नरी* :

उत्तरेस उत्तुंग हिमालय पर्वतराज महान
पूर्व–अपर सागरांस भिडले भुज त्याचे बलवान्
भूमीला मापतो करांनीं
गगना विंधित निज शिखरांनीं
नानाविध रत्नांच्या खाणी उरिं धरितो हिमवान्
शृंगांवर रंगांची लाली
अंगावर मेघांच्या शाली
उतरे संध्या इथें अकालीं पसरित मोहवितान
लिहिति इथें पानांपानांवरि
प्रेमलेख विद्याधरसुन्दरि
वेणुवनीं वाजवी बांसरी वायु इथें बेभान
दिव्यौषधिचे लावुन दीपक
विलास करती वनचर कामुक
लज्जित ललनांवर मेघांचें आच्छादन वरदान
कटीनिकट याच्या ग्रहमाला
बाहुभूषणें रविशशि याला
ऊर्ध्वमुखी किरणांनीं कमलां फुलवितसे भास्वान्

. . .

*विजया-जया* :

ही हिमालयाची उमा, अनुपमा, सुमापरी कोमला
मंदाकिनितीरावरती
ही कालच खेळत होती
परि आज, मुखावरि लाज अनामिक फुलवी रातोत्पला

रत्नांविण देहीं कांती
मद्याविण नयनीं भ्रांती
तें सरलें शैशव, आला अभिनव बहर जुईवेलिला

रंगानें चित्र खुलावें
किरणानें फूल फुलावें
ही तशी अचानक जादू झाली, झाली मदविव्हला

या हंसांनो झडकरी
गति शिका अशी मदभरी
करितात नूपुरें साथ हिच्या मदमंद धुंद पावलां

. . .

*उमा :*

सखये सांगूं गूज कसें तुज, होति मला आभास
नकळे, लागे कसला ध्यास

निळ्या अभाळीं सांजसकाळीं
शिखरांच्या भस्मावृत भाळीं
चंद्रकलेची दिसे झळाळी
नयनांपुढती उभा राहतो धवलहास कैलास

मंदाकिनिच्या तीरावरती
श्मशानभूमितिल एकांतीं
शंख अचानक घुमूं लागती
डमरू घुमती, शूळ वाजती, लाविति कळ हृदयास

भस्म उधळतें अवकाशांतुन
उतरे गंगा आकाशांतुन

भैरवगीतें दहा दिशांतुन
कुठुन कुणाची आर्त अनामिक सय येते जीवास

. . .

*नारद :*

जय नारायण पतितपावन, जयजय हे मधुसूदना
कोटिमदनसम सुंदरवदना, कमललोचना वामना
सर्वाधीशा हे कमलेशा
दूर करी रे भवभयलेशा
हे कंसारी, या संसारीं तारि तारि जगजीवना

*हिमालय :*

देवर्षे नारदा, हिमालय अर्पितसे सुमनां

*मेना :*

हिमरायाची जाया मेना वंदितसे चरणां

*मैनाक :*

मैनाकाच्या माथ्यावरतीं वरदहस्त ठेवा

*उमा :*

हिमालयाची उमा वंदिते, घ्या माझी सेवा

*नारद :*

हिमराजाच्या तनुजे, गौरी, तूं होशिल त्रिभुवनजननी
विधिसंयोजित वर शिवशंकर, तप करितो आहे विपिनीं
शिवपदपूजन करतां उद्या येइल भाग्य तया योगें
ब्रह्मानें देवांना कथिलें, गौरी तूंच शिवांगी गे

*उमा :*

ती मूर्ती...तो भास...आणि तें भीषण भैरवगान

कैलासाची हांक...आर्त तें हृदयाचें आह्वान
गिरिशिखरावर चंद्रकोर ती तो डमरूचा नाद
स्वप्नांच्या त्या गूढ गुहांतुन दुमदुमले पडसाद

. . .

*उमा :*

आई, सरला ग सहवास
उरला आतां तुझ्या स्मृतींच्या बकुळफुलांचा वास

तव मायेच्या पदराखालीं
आजवरी लाभली सावली
तुझी लाडकी लेक चालली भोगाया वनवास

सायसाखरेपरि तव माया
चंदनछायेपरि तव छाया
कृतघ्न आम्ही तुम्हां छळाया, येतों ग जन्मास

. . .

*किन्नर-किन्नरी :*

चालली एकली वनीं कुणाची बाला ?

चांदण्यांत चंपकफुलें कशीं विरघरळलीं
शैशवांत यौवनझुळुक कशी सळसळली
चंदनी उटींतून उठली केशरज्वाला

रत्नांचीं झालीं फुलें, हिच्या स्पर्शानें
उगवत्या रवीनें दिलें वसन हर्षानें
चालती लता माधवी येत बहराला

. . .

*शृंगी :*

मी शृंगी...

*भृंगी :*

मी भृंगी...

*दोघे :*

हत्तीचें बळ अंगीं

इंद्राची अप्सराच आलिस कां तन्वंगी ?

*शृंगी :*

मी शृंगी...

*भृंगी :*

मी भृंगी...

*दोघे :*

मस्त अम्ही रणरंगीं
देवांना दंड करूं, कां आलिस तन्वंगी !

*उमा :*

मी हिमालयाची उमा, इथें मी आलें प्रभुपूजना
हें कमल दुरुन वाहिन मी
प्रभुचरण दुरुन पाहिन मी
आणीन फुलें जलकलश भरिन अन्
झाडिन मी अंगणा...

. . .

*मदन :*

मी रतिचा पति मोहवितो मति काय करिल यति मजपुढतीं
पुष्पधनुर्धर पंचपुष्पशर बघुनि मुनीश्वर गडबडती

*वसंत :*

मीहि वसंत जगास पसंत जरा न उसंत मला उरली
आज वनांतरिं वृक्षलतांवरि पर्णागणिक फुलें फुललीं

*मदन :*

मी जनमोहन, तूं वनमोहन, तरु-तरुणांना प्रिय दोघे
संगत जमली रंगत रमली हिमगिरिकुहरीं चल वेगें

*वसंत :*

मी मधुहृदयीं, तूं वधुहृदयीं, सदय-अदय कशि होय युती

*मदन :*

अचलतटावर चल तर लवकर दाव वनीं तव रम्य कृती

*वसंत :*

मी फुलविन कमळणिच्या कमलां...

*मदन :*

मी जुळविन भ्रमरांच्या युगुलां...

*वसंत :*

मृगीमृगांना भुलव झुलव तूं नेउनियां एकांत-तटा

*मदन :*

कोरांटीवर उधळून दे तूं गहिऱ्या-गहिऱ्या रंग-छटा

*वसंत :*

तूं मनिं अंगाराला चेतव

*मदन :*

तूं दे पांगाऱ्याला वैभव...

*वसंत :*

तूं-मी मी-तूं, एकच हेतू—त्रिभुवन येइल पायतळीं

*मदन :*

चैत्र–मैत्र मदनाचा आतां त्रिनयन शंभू होय बळी...

. . .

*किन्नरवृंद :*

किरणांचा उघडून पिसारा पूर्वेच्या अंगणीं
नाचतो मोर केशरी कुणी

हा कोकिळ छेडी पंचम गहिऱ्या स्वरीं
या आम्रतरूंवर दरवळती मंजिरी
हा वसंतवारा दैना उडवी पुरी

निळ्या तळ्यांतुन कमरेइतुक्या वर आल्या कमळणी
लाजुनी चूर दंवाचे मणी

. . .

*किन्नर-किन्नरी :*

ही नटे उमा फुलराणी

हातांत बांधले चुडे जुई गजऱ्याचे
कानावर झुकले तुरे शिरीषफुलांचे
केसांत बिलगली रानफुलांची वेणी...

वक्षावर रुळतो हार, झळकतीं पानें
घेतलें करीं हें लाल कमळ लीलेनें
सजवली मेखला हिनें अशोकफुलांनीं

भांगांतुन झुकतें कदंबपुष्प विराजे
या अंगांगांतुन वसंतवैभव साजे
नेत्रांत थरकतें पाणी कमळावाणी...

. . .

*उमा :*

हें फूल पदीं वाहिन मी

ते त्रिभुवनसुंदर डोळे
जरि राहतील मिटलेले
कोमेजुन जातिल झेले
ते चरण तरी सेविन मी...

त्या पिंपळतरुच्या खालीं
झळकते चंद्रिका भालीं
मंद स्मित खुलतें गालीं
तें पुन्हां पुन्हां पाहिन मी...

त्या तशा गूढ एकांतीं
ती मोहक दाहक कांति
पाहतां मुरे मन स्वांतीं
ती मूर्ति सदा ध्याइन मी...

हे गौरीच्या ईश्वरा
एकदांच करुणा करा
मज प्रेमानें उरिं धरा
मग सर्व दुःख साहिन मी...

*वसंत :*

मदना चल कर शरसंधान
भुवईपरि ताणल्या धनूवर चढव तुझा फुलबाण

आज शिवाचे नेत्र उघडतिल
गिरिजेचें तनुवैभव बघतिल
जरा थबकतिल चंचल होतिल
तुझाच तो क्षण जाण...

*मदन :* (स्वगत)

पिनाकधारी दिव्यशूलधर
हृदयावर हा घेइ कुसुमशर
बघ गौरीमुख शाश्वतसुंदर
दे तिजला वरदान...

*शिव :*

कोण तूं शशिमुखी दिव्य बिंबाधरा...
काय लावण्य हें...यौवनाचा झरा...

कोण तूं...कोण मी...कां इथें तूं उभी ?
आज वारा नवा वाहतो कां नभीं ?

कां अकालीं लता बहरुनी वांकल्या ?
चंचला जाहल्या वृत्ति हृदयांतल्या ?

कोण तो पुष्पशर...समजलों वंचना...
थांब तूं...सहन कर तृतिय या लोचना...

*देववृंद :*

आवरी आवरी क्रोध शिवशंकरा...
सावरी सावरी दीन तव किंकरां...
हाय कल्लोळ हा...
अग्निचा लोळ हा...
थरथरे स्वर्ग वर कांपली बघ धरा...
शरण मृत्युंजया !
दूर रे करि भया
निवटला मदन हा प्रलय झाला खरा

. . .

*उमा :*

कसलें यौवन कसली काया ?
सारीं स्वप्नें सारी माया
अगाध होता तो शिवसिंधु
मी होते इवला जलबिंदु
कशास आतां कुणा निंदूं...
केली पूजा गेली वांया...
विसर आइ मज, विसरा ताता
उमा विसरली साऱ्या जगता
तपस्विनी मी, तप आचरितां
मिसळुन जातिल प्रकाशछाया...

. . .

*किन्नर :*

सूर्यमुखावर त्या शशिमुखिनें लोचन रोखुन धरले
कठोर तप आचरिलें तेव्हां हृदय शिवाचें स्फुरलें

. . .

*उमा :*

मी सृजनाची दिव्य प्रेरणा
कृतांत तूं हें मजला ठाउक
युगांयुगांची प्रीती मी तर
तेज तुझें तें युगसंहारक

रुद्र, तुझें तें तांडव तुंबळ
कोमल माझें लास्य शुभंकर
जन्मांतरिंची पटली ओळख
कुठवर आतां देशिल अंतर

हांक तुला नियतीची देवा
हांक तुला हृदयाची वंचित
हांक तुला आत्म्याची शापित
तुझें नि माझें एकच संचित

*शिव :*

नील गगनांतुनी कोण मज पाहतें...
लाल धरतींतुनी कोण ही वाहते...
धवल गंगेमधें कोण मज नाहते
रोमरोमामधें भरुनि ही राहते

(उमेच्या गीताचे दुरून स्वर)

तूं ईश्वर मी तुझीच माया...
अलग कशाला अपुल्या काया

*शिव :*

गौरी, आज तुझा मी दास
ललिते, तूं निज तपोबलानें जिंकिलेंस हृदयास
रूप तुझें निजरूपीं मुरलें
त्रिभुवन व्यापुनि हृदयीं उरलें
तूंपण-मीपण अपुलें सरलें...आतां चिर सहवास

*उमा :*

युगानुयुग मी पहात होतें रूप तुझें गोरें मनहारी

*शिव :*

आज तुला मीं पुरें जाणलें मी गौरीहर तूं शिवगौरी

*उमा :*

तूं सूर्याची अदम्य दीप्ति

*शिव :*

तूं चंद्राची कोमल कांति

*उमा :*

नक्षत्रांचीं तुला भूषणें

*शिव :*

नक्षत्रचि तूं राजकुमारी...
तूं सृजनाची मंगल नांदी

*उमा :*

मी तर आहें भिल्लिण साधी

*शिव :*

संसाराच्या अश्वत्थाची तूंच पालवी लवलवणारी...

आई :

नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे
खेळगडी केव्हांचे हे झोपलेत सारे

टका टका माझ्या राजा बघूं नको आतां
हळू हळू थोपटतें मी तुला गीत गातां
मीट मीट मोठे डोळे तुझे पाडसा रे
नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे

दूर जाइ हरिणीबाई नको करूं हेवा
बाळाहुन सुंदर डोळे नको मागुं देवा
शपथ घालती तुजला ग नभीं चंद्र तारे
नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे

किती वेळ खेळ तुझा रे रोज रोज चाले
किती किती दमला राजा, तोंड सुकुन गेलें
गीत तुला अंगाईचें गाति मंद वारे
नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे

रुंद रुंद भाळावरतीं कुरळ एक खेळे
पंख मिटुन बसले भोळे भिरभिरते डोळे
बाइ, शांत झोपेमाजीं हससि तूं कसा रे
नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे

निजली सरकारांची स्वारी
माझा राजा अचपळ भारी
गोड गोड कां हसतो गालीं
कसलीं बाई स्वप्नें पडलीं ?

. . .

स्वप्नमालिका :

जादूचे पंख पहा फुटले बाळांना
चलो हटो बाजू व्हा, उंच उडूं द्या ना

उंच निळ्या आकाशीं
जाउं ढगांच्या पाशीं
पकडूं दे हातानें आमुच्या विमाना

भिरभिरतां दश दिशांत
चंद्राच्या आरशांत
पाहुं अम्ही पुन्हा पुन्हा वेळावुन माना

ताऱ्यांचे डूल करूं
सूर्यहि हातांत धरूं
कोण अम्हां अडवणार सानुल्या मुलांना

मुलांना...मुलांना...

काय पण मुलें
खातायत् फुलें !

लाल लाल कुणि जास्वंदीचीं
कुणी पांढरीं जाइजुईचीं
भीति न यांना कशी आइची...

काय पण मुलें
खातायत् फुलें !

फुलें...फुलें...फुलें...फुलें...

फुलांफुलांवर फूलपांखरें पहा पहा हीं रंगीत

तळहाताहुन मोठालीं
कोठुन हीं येथें आलीं ?
रंग मजेचे सोनेरी
मिशा लांबड्या कांटेरी

घेउन गिरकी
मारुन फिरकी
फिरती अपुल्या गुंगींत
फूलपांखरें रंगीत

हजार हीं येथुन उठलीं
शिस्त पांखरांना कुठली ?

पिवळीं हिरवीं लाल निळीं
यांचे कपडे सोनसळी

सुळकन् उडती
फुलांत दडती
गुणगुणती कुणि संगीत
फूलपखांरें रंगीत

रंगीत...रंगीत...

रंगित रंगित निळे जांभळे
पोपट पंछी कुठून आले

लाल तयांच्या लांबट चोंची
अंब्यावरतीं मारति टोंची

फडफड करती हिरवे पंख
पेरूंना कुणि करती डंख

वाजविती कुणि ऐटींत शीळ
कुणी कुणी खाती जांभूळ

लाख लाख हे पोपट उडती
गिरक्या घेती जाती वरती

मउ गवतांचें घरटें करती
वरती वरती सुळक्यावरती

सुळक्यावरती...सुळक्यावरती...

सुळक्यावरुनी झुळुझुळु खालीं पडतें आहे पाणी
पाण्यामध्यें न्हात आहे ही राजाची राणी

राणी अपुली न्हातां न्हातां गाते आहे गाणीं
गाणीं कसलीं रडगाणीं ही म्हणते वेड्यावाणी

वाणीऽऽ वाणीऽऽ...

वाणीदादा वाणीदादा अहो वाणीभाऊ
दुकानांत लपवलें काय काय पाहूं

खारकांचें पोतें एक पाठवावें घरीं
बेदाण्यांच्या पडाऱ्यात सरींवर सरी

अहो वाणीदादा उठा—उठा वाणीभाऊ
पोतेंभर रुपयांचा हवा आहे खाऊ

किती ? किती ?...

किती मजेचा देश पहा हा चैन मुलांची किती
आनंदी आनंद चहुंकडे नाहिं कुणाची भिती

अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

चॉकलेटच्या भिंतीचें हें पहा केवढें घर
खिडक्यांवरती कांचा नाहिंत परी खडी-साखर !

लिमलेटांच्या माळा येथें घरोघरीं टांगती
किती मजेचा देश पहा हा चैन मुलांची किती

रस्त्यावरती येतां जातां द्राक्षें देती मुलां
मैदानावर घड केळ्याचा जिथें तिथें टांगला

शाळेमध्यें पेढे—बर्फी सर्वांना वाटती
किती मजेचा देश पहा हा चैन मुलांची किती

या देशाचा राजा आहे—

राजा...राजा...

राजाची ऐट जरा पहा पहा
राण्या तर राजाला सहा-सहा

जरतारी लांब झगा हिरवा हिरवा
मखमाली पट्टा वर भगवा भगवा

झळके तलवार कशी अहा अहा
राजाची ऐट जरा पहा पहा

प्रधानजी एक विदूषक झाला
चोपडला लाल रंग गालाला
नाक लांब लांब फूट दहा दहा...

लांब-नाकड्या विदूषका
तुला मारतो मी हांका

मराठी ग्रंथ संग्रहालय
का. क्र. 92...
शाखा

लांबटमान्या
लंबूनान्या
ऐट दाखवूं नको फुका
लांब-नाकड्या विदूषका

इकडे ये ना
मारित ताना ( ऽऽऽऽऽ )

काय पण तान
गाढवावर ताण

ए तूं गद्ध्याचा काका
लांब नाकड्या विदूषका

आलों...थांब...धरतों...थांब
आलों...थांब...धरतों...थांब
सापडलां तुम्हि बच्चेराव
आई ग ऽ ऽ ये धाव...धाव...

*आई :*

नीज नीज माझ्या बाळा नीज राजसा रे
खेळगडी केव्हांचे हे झोपलेत सारे

REFBK-0012748
REFBK-0012748

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३६२१ कि.
क्रमांक ९५८५ नों. दि. २७-११-८२